

# कबुतरखाना

महेश कराडकर

**अल्प परिचय**

**महेश नामदेव कराडकर**
जन्म दिनांक १०.१०.१९६१

- 'चतुरंग अन्वय' या दिवाळी अंकाचे गेली ११ वर्षे संपादन.
- सांगली आकाशवाणी केंद्रावरून प्रसारित झालेल्या मुक्तांगण, प्रतिबिंब, प्रभातीचे रंग इत्यादी मालिकांचे लेखन.
- वृत्तपत्रे व नियतकालिकांमधून स्फूटलेखन.
- अनेक सांस्कृतिक, सामाजिक उपक्रमांमध्ये कार्यकर्ता म्हणून सहभाग.
- विविध ग्रंथ संपादनात सहभाग.
- चतुरंग ॲडव्हर्टायिझिंग ॲन्ड मार्केटिंग, सांगली या जाहिरात संस्थेमध्ये संचालक.

# कबुतरखाना

महेश कराडकर

पद्मगंधा
प्रकाशन

Kabutarkhana (Collection of poems)
Mahesh Karadkar

**कबुतरखाना** (कवितासंग्रह)
महेश कराडकर

**प्रकाशक ।** अरुण जाखडे
पद्मगंधा प्रकाशन,
१९६६, तारा-भुवन, माडीवाले कॉलनी,
सदाशिव पेठ, पुणे - ४११०३०
फोन-(०२०) २४४५०२६०, मो. ७३५०८३९१७६
Website : www.padmagandha.com
E-mail : arunjakhade@padmagandha.com

**© आशा महेश कराडकर**
द्वारा चतुरंग ॲडव्हर्टायझिंग,
एफ-४, कलाश्री आर्केड, राममंदिर चौक,
सांगली, फोन-०२३३-२३७४००७, २३२२५१५

**अक्षरजुळणी ।** चतुरंग डिझायनिंग विभाग

**मुखपृष्ठ ।** सुरेश पंडित

**प्रथम आवृत्ती ।** डिसेंबर २०१३

**मुद्रक ।** सकाळ पेपर्स प्रा. लि.,
डी-४, एमआयडीसी, शिरोली, कोल्हापूर - ४१६ २२३ (महाराष्ट्र)

**मूल्य ।** ₹ १००/-

ISBN 978-93-82161-95-0

तीर्थरूप दादा आणि आई
तुम्ही सदैव जपलेल्या निर्लेप माणूसपणाला –

**लेखनकाल**

१९८२ ते २०१३

**पूर्वप्रसिध्दी**

अक्षर, कवितारती, रुची, मिळून साऱ्याजणी, अभिजात, आभाळमाया, लोकमत, पुढारी, झपूर्झा, चतुरंग अन्वय, दिशा इ.

आकाशवाणी मुंबई केंद्र / सांगली केंद्र / ग्रीन एफएमवरून कविता वाचन प्रसारित

**ऋणनिर्देश**

प्रा. म. द. हातकणंगलेकर, डॉ. तारा भवाळकर, प्रा. डॉ. मोहन पाटील,
अरुण जाखडे, प्रा. अविनाश सप्रे, डॉ. महेश केळुसकर,
प्रा. वसंत केशव पाटील, राजा शिरगुप्पे, प्रा. वैजनाथ महाजन,
प्रा. गौतमीपुत्र कांबळे, प्रमोदजी कुलकर्णी, डॉ. अनिल मडके,
सौ. नीना आणि अरुण नाईक, भिमराव धुळुबुळू, प्रा. प्रदीप पाटील,
प्रशांत के. कुलकर्णी, सौ. आशा कराडकर, स्व. अनिल शहा, मिलिंद गाडगीळ,
अभय पाटील, सौ. शामला पुराणिक, पद्मगंधा प्रकाशन व 'चतुरंग'चे सर्व सहकारी.

## अनुक्रम


| | | |
|---|---|---|
| कविता | । | १ |
| ज्या प्रदेशात | । | २ |
| कॅक्टस | । | ३ |
| म्हशी | । | ४ |
| सत्कार | । | ८ |
| बाजार | । | ११ |
| ती आलीय | । | १३ |
| द्वंद्व | । | १५ |
| आशा | । | १७ |
| फॅशन शो | । | १८ |
| सध्या कसं आहे? | । | १९ |
| जन्म | । | २१ |
| अनर्थ | । | २३ |
| चबुतऱ्यांचे एकत्रीकरण | । | २४ |
| तू कधी उगवणार? | । | २६ |
| सायबांनो! | । | २७ |
| निष्ठावान | । | २८ |
| यमदूत | । | ३० |
| सहा हातांचं माकड | । | ३२ |
| डायव्हर्शन | । | ३५ |
| हत्येपूर्वी | । | ३७ |
| तू आता कोण झाला असशील? | । | ३८ |
| भाषा १/२/३ | । | ४० |
| हुकमाचे पान | । | ४३ |
| ट्रेनिंग | । | ४४ |
| साभार परत | । | ४५ |
| ''असं ऊन कधी पडलंच नव्हतं!'' | । | ४६ |
| जमीनदोस्त | । | ४८ |
| अंधश्रध्द देव्हारा | । | ४९ |
| बुजगावणं | । | ५० |

फॅशन । ५१
कबुतरखाना । ५३
चौकट । ५५
सौदागर । ५७
रविशंकर । ५८
कोऽहम्? । ६०
हातामध्ये धरला टाक । ६१
पाखरांना वरून आदेश । ६२
मोर । ६३
देहधर्म । ६४
उन्ह सोनेरी । ६७
फुलांना फुलू दे । ६८
प्रिय । ६९
शहारा । ७०
कोंडी । ७२
संध्याकाळ । ७३
कडेलोट । ७४
कलाकुसर केलेलं गोंडस शून्य । ७५
धुकं । ७६
माती । ७७
चांदणं । ७८
अमजदअली । ७९
मरणपालखी । ८०
खुळखुळा । ८१
आव । ८२
विसर विसर विसर । ८३
मन । ८५
गफलत । ८७
आत खोल । ८८
युगामागुनी युगे । ८९
भान । ९०
कविता का लिहायची? । ९१

## कविता

रणरणत्या उन्हात
पावसाची सर कोसळून जावी
आणि पुन्हा पसरावं
आरसपानी सोनं इथं तिथं

साठलेल्या जिवंत पाण्यात
आनंदानं पिसं फुलवून
चिमण्यांनी हुंदडावं... डुंबावं...
तसा प्रत्येक शब्द माझ्या
भिजल्या डोळ्यांत बागडून
जाऊन बसला आहे
तारेवरच्या सोनउन्हात

...कदाचित तारेवर अंग फुलवून
बसलेल्या शब्दांनाच
कविता म्हणत असतील...

तुला काय वाटतं?
■

## ज्या प्रदेशात...

ज्या प्रदेशात
कायदे
पुस्तकात बंदिस्त आहेत
लोककल्याण
फक्त शासकांच्या छापील जाहिरात मसुद्यात... आणि
विचारस्वातंत्र्य
कुणीतरी पाळलंय जबरदस्तीनं

ज्या प्रदेशाचा
वर्तमान
उद्याची रद्दी म्हणून पाहण्यातच धन्यता असते... आणि
इतिहास
पिढ्यापिढ्यांच्या खाडाखोडींनी भरलेला

त्या प्रदेशातील
कातळांच्या फटीतून
आजही उगवतात इवल्या फुलवेली
उद्याच्या आशांची हसरी फुले घेऊन
■

## कॅक्टस

दोस्त होऽऽ
काल त्यांनी माझ्या घराच्या विटा काढून
आपल्या घराभोवती कुंपणं बांधली
तेव्हा मला काही वाटलं नव्हतं...
पण...
आज त्यांनी माझा मेंदूच काढून घेतलाय कवटीसह
आणि लावले आहेत तिच्यात
कॅक्टस...
आपल्या बागेच्या शोभेसाठी
आता मला वाटतं...

सॉरी, आता मला काही वाटायचा
प्रश्नच उरलेला नाहीय.

■

## म्हशी

म्हशी किती निवांत असतात
त्यांना कधीच होत नसावा ब्लडप्रेशर किंवा शुगरचा त्रास.

एखाद्या स्थितप्रज्ञ कातळासारख्या काळ चघळत...
म्हशी कधी रवंथ करत असतात...
कधी टळटळीत उन्हात सूर्याला वाकुल्या दाखवत...
तळ्यात नाकाडं वर करून डुंबत असतात...
कधी बावरलेल्या बटबटीत डोळ्यांनी गोठ्यात
चिंता'ग्रास' खात मुकाट बसलेल्या असतात...
तर कधी पायातलं लोढणं चुकवत फेंगाडत उधळताना
मोकाट असल्याचा आव आणत असतात...

म्हशी किती स्वस्थ असतात पिढ्यान्‌पिढ्यांच्या सवयीनं
कासेचं रेडकू बाजूला सारून चरवीत दूध पिळून घेणाऱ्या
धन्याबद्दल करूण श्रध्दा डोळ्यात साठवून

'भरवशाच्या म्हशीला टोणगा' झाल्यावरही
कधीच होत नाही तिचा अपेक्षाभंग
द्यायचं तसंच दूध देत, ती पुन्हा पुढच्या वर्षीचा
वायदा करते मूकपणे... आणि टोणग्यालाही चाटते प्रेमभरानं...

म्हशी किती निरागस असतात
दुभत्या झाल्यावरही त्यांना कळतच नाहीत व्यवहार
मालक बदलला तरी बदलत नाही
त्यांची धार द्यायची सवय
त्या का जन्मतात, कशा मरतात,
त्यांचं दूध कोण पितं... कशाचीच नसते त्यांना खबरबात.
त्यांच्याच कातडीचे जोडे घालून मालक दूध केंद्रांवर
आणि नोटा त्यांच्या खिशात

अर्ध्या रात्री दुधाचे टँकर महानगरात...
माणसं पैसे कशी खातात याचा विचार करत म्हशी
मनातल्या मनात फिदीफिदी हसतात म्हणे गोठ्यात बसून.

संभोगाकडून समाधीकडे जाण्याचेही म्हशींचे मार्ग
आता बंद आहेत कारण...
म्हशींच्या खुरांवर मोजता येतील एवढेही रेडे
मालक शिल्लक ठेवत नाहीत.
आणि मालकांना मात्र फक्त मुलगेच व्हायला पाहिजेत,
यामागचं गौडबंगाल म्हशींना अजूनही कळलेलं नाही.
कितीही चारा घोटाळे झाले तरी
म्हशी म्हणजे चाऱ्याचं दुधात रूपांतर करणारं
फक्त एक जिवंत मशीन!

म्हशी किती मठ्ठ
भाकड झाल्यावर निमूट जातात कसाईखान्यात...
म्हशींना गाईंसारखं देवत्व मिळालं नाही कधी
त्यांची तशी तक्रार अथवा मागणीही नाही सरकार दरबारी
गाईंचा द्वेष करण्याइतका अतिरेकी मत्सरही नाही त्यांच्यात

जन्मापासून मरेपर्यंत अज्ञानाची काळीकभिन्न पखाल
त्यांच्या पाठीवर ओझे होऊन...
परंपरेच्या ट्रॅफिकचे सगळे सिग्नल
म्हशी अज्ञानातून आलेल्या प्रचंड आत्मविश्वासाने तोडतात...
या गुन्ह्याबद्दलसुध्दा त्या अनभिज्ञच असतात...
दुष्काळात उपासमारीनं प्रमाणाबाहेर हडकलेल्या त्यांच्या
बरगड्या दाखवणारे फोटो
प्रमाणाबाहेर डाएट केलेल्या मॉडेलसारखे वर्तमानपत्रात छापून येतात...

तेव्हाच सरकारला दुष्काळाची खात्री पटते

परवा सरपंचाच्या म्हशीचा जत्रेत नंबर आला.
बहुदुधी, आखुडशिंगी, कमी चारा खाणारी म्हणून.
...पण ती मात्र रेड्यांच्या टकरी बघून भेदरून गेलेली
त्यांनी आपल्यासाठी भांडावं असं तिला वाटत होतं.
ते मात्र मत्त होऊन मालकांच्या ईर्षेसाठी जिवावर उठलेले एकमेकांच्या.

आपलं म्हैसपण जन्मापासून गहाण असल्याचं ती
जत्रेतल्या म्हशींना हंबरून हंबरून सांगत होती...
... पण म्हशी म्हशींची भाषा विसरल्या असाव्यात.
त्यांना फक्त मालकाचं 'हल्या हल्या'च कळत होतं...
नंबरातल्या म्हशीचा म्हैसजागरणाचा प्रयत्न त्यामुळे फोल
ठरत होता... आणि त्याच फोलपटांची पेंड
सरपंच तिला खाऊ घालत होता साळसूदपणे.

म्हशी कधी माणसाळल्या याचं संशोधन करण्यासाठी
यमाच्या रेड्याआधीचे संदर्भ तपासण्यात येतायत
इतक्या गरीब जिवापोटी महिषासुर कसा जन्मला
याचंही संशोधन व्हायला हवं
ज्ञानोबांच्या काळात संशोधनाचं फॅड नव्हतं
नाहीतर त्यांनी महिषामुखी वेदांबरोबरच
रेड्यांचा इतिहासही वदवून घेतला असता.

अनेक सत्ता उलथल्या, राजेरजवाडे लयाला गेले,
संस्थानं विलीन झाली, आता लोकशाही आली, पण...
पण म्हशींना त्या माणसाळल्या तेव्हापासून
एकही आंदोलन करणं आजतागायत जमलेलं नाही,
'लोढणी काढा... कासरा सोडा' अशी साधी घोषणाही

त्यांनी कधी दिली नाही.
... कारण आणीबाणीच्या परिस्थितीतही
म्हशी कधीच असमाधानी, असंतुष्ट नसतात!
■

## सत्कार

दोस्त होऽऽऽऽ
काल त्यांनी माझा सत्कार केला
आणि माझा एक फोटोसुध्दा काढला...
काळ्या गाऊनमधला
मग त्यांनी मला एक सुरळी केलेलं प्रशस्तिपत्र
पदवी म्हणून प्र-दान केलं...
बापजाद्यांच्या इस्टेटीवर
कमवून आणायची दोनपाच वर्षं आरामात बसून काढली म्हणून.

... मग हे म्हणाले, ‘आता आम्ही तुझी मिरवणूक काढणार’
मी घाबरलो, गांगरलो, मागं मागं सरकायला लागलो
तर यांच्यातल्याच एका खळीच्या टोपीवाल्यानं
एक शक्कल लढवली...
त्यानं एक पेंडी बांधली मोठमोठ्या आश्वासनांची
आणि माझ्यापुढं चालू लागला.
मग मीदेखील नुकत्याच घेतलेल्या ईदच्या बकऱ्यासारखा
त्यांच्या मागून आशेनं चालू लागलो निमूट
आणि आमच्यामागं हे सगळे ढोल-ताशे वाजवत
घोषणांचा गदारोळ उठवत...
त्या सगळ्या कोलाहलात ते काय कोकलतायत
ते काहीच कळत नव्हतं.

मिरवत मिरवत त्यांनी मला एका समुद्राच्या काठाशी आणलं.
असा समुद्र ज्याची नामोनिशाणी या देशाच्याच काय पण
संपूर्ण जगाच्या नकाशात कुठंच आढळणार नाही.
... त्या समुद्रात माझ्यासारखीच अनंत डोस्की
अथांगपणे तरंगत होती.

त्यांनी माझ्या नावानं जोरदार यळकोट केला.
तीनदा झोले दिले
आणि मला त्या समुद्रात भिरकावून दिलं.
चार-पाच गटांगळ्या खाल्ल्या.
हातपाय हलवत, घुसमटत मुंडकं पाण्याबाहेर काढलं
आणि अवाकपणे किनाऱ्याकडे बघू लागलो तर ...
किनारा एकदम सुनसान, काहीच न घडल्यासारखा
सगळेच गिल्लाखोर गायब झालेले...
फक्त एक व्यक्ती उभी होती किनाऱ्यावर
छातीशी हात बांधून... झुकल्या मानेनं
मी चटकन ओळखलं ते सर होते... 'सर!'

ज्यांच्या प्रत्येक शब्दासाठी आमचे कान
सदैव आसुसलेले असायचे ते सर...
सर कुंथल्यासारखे हसले
आणि पाल चुकचुकल्यासारखे पुटपुटले...
'पुढं काय करायचं ठरवलंयस?'

त्यांच्या नजरेत जणू भावनांचा समुद्र साकळलेला

मी हातपाय मारता मारता भारावल्या बाळबोधपणानं म्हणालो,
'सर, मी तुमचाच आदर्श ठेवलाय...
तुमच्यासारखाच मीही नव्या समाजरचनेचा
पायाभूत घटक होणार'...

सर पुन्हा हसले कुंथल्यासारखे
आणि ओशटपणे चुकचुकत म्हणाले...
'अरे, तीस वर्षांत आम्ही कुठं निर्माण केलाय नवा समाज?

आम्ही केला... तो फक्त षंढांचा व्यवहार
आम्ही घडवला नाही नवा समाज, पण समाजाच्या टाळूवर
एक गळू निर्माण केलंय मोठ्ठं...
जे कापताही यायचं नाही कधी'

तेवढ्यात, एक हात वर आला आणि
त्यानं माझं मुंडकं समुद्रात दाबलं.
गटांगळ्या खात खात तळाला गेलो तेव्हा
एक जण गुदमरत म्हणाला...
'त्याचा हात वरपर्यंत होता. त्याला सरकारी नोकरी मिळाली.'
माझी पोटतिडीक आणखीच हताश झालेली
घुसमट थांबवावी म्हणून
या सगळ्या चेंबाचेंबीत मी कसेतरीच हातपाय मारत राहिलो
आणि जिवाचा आटापिटा करून एकदाचं
मुंडकं समुद्रसपाटीवर काढलं
खुल्या श्वासाचा हर्ष उरात साठवत एक आनंदाचा चित्कार
ओठातून फुटू पाहत होता... इतक्यात
धप्पदिशी काहीतरी माझ्या उरावर येऊन आदळलं
... आणि माझ्या लक्षात आलं,
बहुतेक आजही कुणाचा तरी
सत्कार झाला असावा.

■

# बाजार

बाजार घामेजलेला व्यवहारांनी...
कोणालाच नाही सुतक सोयरेपणाचं
तिथं श्रध्दा किलोवर... प्रेम लिटरवर...
आणि तिरस्कार घनफुटांवर... हवा तेवढा उपलब्ध..!
प्रत्येकाचा भाव नजरेच्या काट्यावर
फाट्याफाट्यावर तोलून मापून.

ती मातृत्व विकते किंवा देते भाड्यानं
आणि तो मांडतो लिलाव आईचा...
अनेक ठिकाणी महान तत्त्वांचीही बोली लागते
कोकलून कोकलून

प्रत्येकाजवळचेच 'पाच' चोर
बाजार लुटायला बघतात शिताफीनं
...आणि नंतर पुन्हा चोर ज्याच्या त्याच्या अंतर्यामी,
चोरकप्प्यात आसऱ्याला
...आणि मग हा बाजारबसवेपणा असह्य झाल्यावर
एखाद्या धनदांडग्या बिलंदराला उचंबळून येते
दातृत्वाची वांती...

पुन्हा उभं राहतं मोठ्ठं धर्मस्थळ
घोंघावतात बाजार, लंपट माश्यांचे थवे होऊन
घामट तीर्थप्रसादावर आंधळ्या श्रध्दावंतांचा
भुरका होऊन...

माझं बरोबर की चूक
पुण्य की पाप...
स्वार्थी चेंगटपणात गुदमरतो जो तो
डबडबतो अप्रामाणिक कष्टांच्या घामानं... आणि

कोसळू नये आपलं सत्वहीनपण म्हणून
तर्कविसंगत निढळाचा घाम पुसत
हरवलेल्या चेहऱ्यावर उसनं अवसान आणत
पुन्हा उभा राहतो आधार घेऊन बाजाराचा...

बाजार घामेजून जातो पुन्हा एकदा फसव्या व्यवहारांनी...!
■

# ती आलीय

ती आलीय
एक लपलपती, अखंड, अविरत शून्यगतीनं धावणारी
किळसवाणी झुंड
तिला रोखू शकले नाहीत
कसलेच धर्म-अधर्माचे दरवाजे
शतकानुशतके, सहस्रकानुसहस्रके
ती अशीच चिरशांती देत-घेत बेफाट पसरतेय
शून्यगतीनं

ज्ञानाची कवाडं तिनं कधीच पोखरून टाकलीयत
बुलंद चौकटींसकट
पुस्तकातली अक्षरन्अक्षरं चघळून तिनं त्यांची चिकट लाळ
दलदलीसारखी पसरून टाकलीय
त्यावरून मी, तो, ती, ते सारेच जण सटासट आपटतोय बुडांवर
सडकून निघेपर्यंत
...आता तर सारेच इतके असहाय की
पाय असणे, हा कुण्या जन्मीचा गुन्हाच वाटावा...
नंतर आम्ही सारेच
त्या अक्षरांच्या चिकट्याचे अर्थ लावत
एकमेकांना चाचपडत सरपटणे पसंत करतो आनंदाने

शेवटी जगायला मिळणं कसंही,
हाही एक किताबच असतो ना!

ती आलीय, हे आम्हाला फार उशिरा कळतंय
असं आता वाटतंय.
कदाचित आमच्या हजार पिढ्या झाल्या,
तेव्हा त्यांच्या काही अब्ज पिढ्या झाल्या असतील.

वाडे, वस्त्या आणि अनेक संस्कृती
त्यांनी आपल्या चाहूल न देणाऱ्या गतीनं
सतत गिळत ठेवल्या आहेत.
आम्ही मात्र रोज नव्या परिवर्तनाचे पडघम
जीव खाऊन वाजवतो
तेव्हा आमच्या ढोलावरची काठीसुध्दा
जुन्या अक्षरांच्या चिकट्याची तार धरून
लडबडलेली असते!

आणखी पुढं काही युगं अशीच गेल्यावर
आमच्या वारसांना हातपाय असण्या-नसण्याची
आवश्यकताही जाणवणार नाही
...छातीला फुटलेली बोटं की-बोर्ड दाबतील
नाकाच्या भोकांभोवतीचे बुळबुळीत मोठे डोळे
स्क्रीनवर रोखलेले असतील...
आणि मेंदू पोखरणाऱ्या, अक्षरे खाणाऱ्या,
आख्खी संस्कृती गिळत आलेल्या
वाळवीची जागा तेव्हा
व्हायरसांच्या झुंडीच्या झुंडींनी घेतलेली असेल.
■

# द्वंद्व

पुलाखालून पाणी संथपणे वाहतंय

नदीचं पवित्र पात्र गावागावातलं मलमूत्र
सांडपाणी गोळा करत हळूहळू पुढं सरकतंय

खच्चून भरलेल्या धावत्या एसटीतून
भलंदांडगं कुंकू ल्यायलेली एक घामेजलेली बाई
कनवटीची चिल्लर चाचपत
एक नाणं लगबगीनं काढते
...आणि आयुष्याची पुंजी दान करावी
अशा नाठाळ श्रध्दाळूपणानं
जीव खाऊन बसच्या खिडकीतून
अरुंद पुलाकडे नदीच्या पात्रात भिरकावते

नाणं हेलकावत नदीच्या तळाला
जिळबट शेवाळात गडप झालं असेल
माझ्या सदैव द्वंद्वात असलेल्या मनासारखं

इकॉनॉमीच्या नाकावर टिच्चून
श्रध्देच्या बाजारू मानसिकतेत झिजत
नाणं आपल्या दोन्ही बाजू
गाळात हरवून बसलंय

पुलाखालून खूप पाणी वाहून जाईल कदाचित
...पुढं पूलही असेल, नसेल

या युगानंतरच्या पिढ्यांना
आपल्या संस्कृतीची माहिती देण्यासाठी
त्या नाण्याचा उपयोग होईलही कदाचित

...पण नाणं फेकणाऱ्या बाईची
मानसिकता कळणार नाही नाण्यावरून

खच्चून भरलेल्या एसटी बसबरोबर
माझं शरीर प्रवास करतंय
मनाच्या दोन्ही बाजू
नाण्याबरोबर खोल रूतत जातात
या शतकाच्या श्रध्दा-अश्रध्देच्या गाळात
■

# आशा

काल मी तुझ्या उरात मेलो

कुणीतरी खणतंय खड्डा
माझ्या कबरीसाठी... तुझ्या उरात

क्षणोक्षणी मी हळुवार जपलेल्या
तुझ्या असंख्य प्रतिमा
खड्ड्याभोवती तटस्थ उभ्या
काळी वस्त्रे पांघरून

माझं श्रांत कलेवर...
शेजारीच पहुडलंय शुभ्र वस्त्रात गुंडाळलेलं
तरीही माझे टक्क उघडे, थिजलेले डोळे
अजूनही निरखतायत तुझा प्रत्येक चेहरा
तुझ्या उरातला गडद अंधार छेदत

त्यांना आशा वाटतेय...
तुझ्या कुठल्यातरी चेहऱ्यावर
दोन अश्रू ओघळतील म्हणून...
■

## फॅशन शो

देहाला अवघ्या
कसले हे साकडे
अंगास डाचते
वस्त्र तिला तोकडे

भर्जरी नसू दे
झाक तुझी ती काया
ह्या कुठून आल्या
सांडत काया बाया

ना खंत खेद अन्
शरम राखली यांनी
बेशर्मीचे फेडले
क्षितिज कैकींनी

ते झोत उरावर
उसासुनी चिकटले
बाजार नरांचे
नारींनी टिचवले

या मिरवत आल्या
काय कुणा समजेना
या नटल्या की फाटल्या
तेच उमजेना

मुक्त मी मुक्त आम्ही
ध्वनी कळसाला पोहोचला
मुक्तीचा चेहरा
बासनात हरवला.

■

## सध्या कसं आहे?

''सध्या कसं आहे?'' कुणीतरी विचारतं सहज
थोडंसं हसावं वाटतं, ओठ एका कोपऱ्यात गोळा करून
हे ओठ असे कधीही गोळा होतात एका कोपऱ्यात...
विपन्नावस्थेत, हताशपणात, आनंदात, मजेत,
पोरकेपणाच्या जाणिवेने,
कधी कुणी फालतू ठरवलं तरी,
एखादा मेल्याची वार्ता कळल्यावरही
ओठांनी असं एका कोपऱ्यात गोळा होणं
ही एक सोयच म्हणायची

''बरं आहे ना?''
बरं ऽऽऽऽऽ ऽऽ ऽऽऽऽ ऽ ऽऽऽ?
डोळे उगाचंच मन कुठं असतं तिकडे आत आत वळतात.
भर्दुपारच्या वैशाखात आंब्याच्या सावलीतून एखादा कावळा
गारवा सोडून पेटल्या माळावर भेलकत गेल्यासारखे
डोळे मन असतं तिकडे क्षणात
जीव खाऊन पंखपीट करतात...

कॅनव्हास कोरा अगदी क्षितिजापर्यंत...
कसल्याच रंगाचा कुठंच ठिपकासुध्दा नाही,
कसला डागही पडलेला नाही.
कावळा पुन्हा सावलीला येण्यापूर्वीच
उन्हात कुठंतरी शिजून मरून जातो
डोळे आतच हरवलेले... मन वगैरे असतं तिकडंच कुठंतरी
नजर हरवलेल्या डोळ्यांवर
खाऱ्या पाण्याची एक संथ लाट मुरत जाते
समोर फक्त कोरा कॅनव्हास
वाऱ्यावर अस्वस्थपणे हलणारा

कसलं वादळ उठतंय... काय होतंय...
कॅनव्हास फाटला तर?
''कसं काय बरं आहे ना?'' असं विचारणारा
अचंबा करत समोरून कधीचाच गर्दीत गायब...
जाऊ दे झालं... ओठ कोपऱ्यात हळूच गोळा होतात.

ट्रॅफिक जाम...
हॉर्न आणि पुसट शिव्या ऐकत
बाजूला होताना
आतून एक जोरदार उबळ येते
कोकलणाऱ्या सगळ्या ट्रॅफिकलाच
बेंबीच्या देठापासून विचारावं,
''काय, कसं काय बरं आहे ना?''
आणि पहावं त्यांचे ओठही
कोपऱ्यात गोळा होतात का ते...
■

## जन्म

रात्री...
भक्क पिवळ्या भडाग्नीच्या
स्मशान उजेडातल्या
उजाड चेहऱ्यांच्या माणसांच्या
कोंडाळ्यात कोंडलेल्या

तिथं अतृप्त आत्म्यांचा दबाव
आणि तृप्तीसाठी हपापलेल्या
हलत्या बोलत्या माणसांचा प्रेतवत वावर

रातकिड्यांनाही झपाटलेलं भुतांनी
आणि आग झालेली चेष्टेखोर
तडकडताई

रात्री... सुन्न आठवणींच्या ठिणग्या
सुपात पाखडाव्यात तशा...
माणसांना भद्र-अभद्राच्या
गोष्टींनी घोळून घेणाऱ्या
किरवंती ताठर जोड्यांच्या
करकरीने धास्तावणाऱ्या

रात्री... अगम्य
नदीच्या पात्रात बुडी मारून
भडाग्नी देण्यापूर्वी हुडहुडणाऱ्या
वारसांसारख्या

आणि रात्री...
कवितेचा जन्म होताना
ओल्या मातीच्या वासाने

उधाणणाऱ्या
आत्म्याचा निर्भर जागर मांडणाऱ्या
चांदण्याला चंदनाचा श्वास देणाऱ्या...
■

## अनर्थ

अनर्थाचे जिणे
निरर्थाच्या ठायी
सार्थ कैसी व्हावी
ओवी ओवी

नशा नांदे जिवी
बंदी छंदी फंदी
झाली फांदी फांदी
अनर्थचि

शब्दच्छल उरी
जिवाच्या जिव्हारी
धारही कहारी
अनर्थाची

अनर्थांचे रंग
भाळती अडाणी
दंभाची फोडणी
ढंग करी

माझे तुझे स्वार्थ
वाकुल्या निरर्थ
अनर्थाप्रित्यर्थ
जिणे खरे

■

## चबुतऱ्यांचे एकत्रीकरण...

एकाच घरात
किती वेगवेगळ्या विचारांची,
वेगवेगळ्या मतांची,
वेगवेगळ्या स्वप्नांची,
वेगवेगळ्या छंदांची,
वेगवेगळ्या सवयींची,
माणसं राहत असतात.
त्या 'सह'वासाला काय म्हणायचं?

उंबऱ्याबाहेर आलेला प्रत्येकजण
कोणतं ध्येय घेऊन पाऊलं टाकत असतो,
कोणत्या वासना भिरमिटत असतात त्यांच्या मेंदूत,
कोणती अदृश्य वेसण त्यांचा रस्ता ठरवत असते,
कोणती झापडं त्यांना नजरबंद करत असतात
आणि तरीही खोल आत त्यांनी
कशा ताणून धरलेल्या असतात
त्यांच्या इच्छा-आकांक्षा-अपेक्षा-ऊर्मी वगैरे वगैरे?

गल्लीच्या तोंडापर्यंत रुळल्यासारखी वागणारी माणसं हमरस्त्यावर येतात
तेव्हा ती अनोळखी होत जातात का?
एकीकडे स्वतःबद्दलही अनभिज्ञ
आणि दुसरीकडे स्वतःच्या त्या त्या क्षणांच्या
स्वार्थाबद्दल दुराग्रही, हट्टी, हमरीतुमरीवर येणारी
जणू प्रत्येकजणच झालेला असतो स्वतंत्र मोर्चा
प्रत्येकाच्या कपाळावर त्यांच्या मागण्यांचे
भले दांडगे अदृश्य फलक.

सारीच अडून बसलेली आपआपल्या मुद्द्यांवर

त्यांनीच त्यांच्या तथाकथित वैचारिकतेतून स्वतःच्या आत
उभारलेला असतो स्वतःचा पुतळा.
पुतळेच पोचतात स्वतःच नेमून घेतलेल्या
दैनंदिन कामकाजावर
आणि पुतळेच ठरवतात विल्हेवाट आपल्या कामकाजाची.

संध्याकाळी कामावरून मरगळलेल्या स्नायूंचे
पुतळे आपआपल्या घरी पोचतात

एका घरात
किती वेगवेगळ्या शैलीतले
वेगवेगळ्या कालखंडातले
वेगवेगळ्या भावनांचे
वेगवेगळ्या अभिनिवेशातले
वेगवेगळ्या भूमिकेतले
वेगवेगळेच पुतळे एकत्र राहत असतात
त्या प्रत्येक पुतळ्याखालच्या
चबुतऱ्यांच्या एकत्रीकरणाला
समाज म्हणायचं का?
■

## तू कधी उगवणार?

तू उगवणार म्हणून
आमच्या झुंजीच्या कोंबड्यांनी
बेंबीच्या देठापासनं बांग दिली
त्यांची पुण्याई मोठी म्हणून
उगवतीला तांबडं फुटलं...

तांबडं फुटलं पण...
तू काही उगवलाच नाहीस.
इथं मात्र एक से एक
तोतये कोंबडे आता पेव फुटल्यासारखे बांगारतात

आता तर त्यांनी
दर पाच वर्षांनीच
तू उगवणार म्हणून
बांग द्यायला सुरुवात केलीय

...तू कधी उगवणार?
■

## सायबांनो!

पाय असून पांगळे
हात असून थोटे
असं काय म्हणता राव...
आम्ही तुमचेच बूटचाटे

तुम्ही कधीही पसरावी झोळी
निमूट आम्ही टाकतो दान
कधी आम्ही पसरता हात
तुम्ही म्हणता काढा घाण

आभाळाचा मुका घेती
तुमचे जिवंत पुतळे
आ वासून आम्ही बघतो
झाकत ढुंगणावरची ठिगळे

चुकून कधी आम्ही म्हणावं,
'काय राव! किती खाता?'
तुम्ही कुंथून कुंथून हाणता
आमच्या कंबरड्यात लाथा

आम्ही सगळे मिळून आता
कंबरच कसावी म्हणतोय
कंबरडं कसं वाचवावं
यावर रोज रोज भांडतोय.

■

## निष्ठावान

न पेलवणारं भलं मोठं, निष्ठेचं कुबड पाठीवर वागवत
मी 'स्वातंत्र्याचे' नारे देत नरडं खरवडत चाललोय
तसं या बाकीच्या साऱ्याच कुबड्यांनी
मला हसायचं कारण?

"हसा बेट्यांनो
त्यामुळे कदाचित स्वत:च्या
पाठीवरचं निष्ठांचं ओझं विसरल्याचा
क्षणिक आनंद उपभोगा, हसा!"

तेवढ्यात समोरून आमचा नेता आला.
माझ्या, बेंबीच्या देठापासूनच्या घोषणांनी
त्याचा अहंभाव कुरवाळला, तो हसला, मंद ठेवणीतलं

भोवतीचे कुबडे लीनतेनं आणखीच वाकले.
त्यानं ताठ उभं राहून, हात वर केला 'दिलाशाचा'
कुबडे हुंकारले संतोषजनक... आणखी वाकले
हुंकारासरशी तो मात्र आणखी ताठ

आम्ही ताठ माणसालाच आमचा नेता करतो
...तो त्याचं कुबड आमच्यावर लादण्यात
यशस्वी झाला म्हणून

त्यानं एक भाषण ठोकलं आमच्यावर,
परंपरेचे बेछूट पोवाडे गाणारं.
भाषण ऐकता ऐकता माझ्या कुबडावर
एक गळू फुटतंय असं वाटत होतं

मी लगबगीनं माझ्या पुढच्याच्या पाठीकडं बघितलं

त्याचा सदरा फाडून त्याच्या कुबडातून
भल्या मोठ्या गळवाचा एक कोंब बाहेर आलेला
तसा तो माझ्याहीपेक्षा निष्ठावान होता.

■

# यमदूत

तुम्ही आम्ही मेलो की 'गचकला!' म्हणतात
जरा बऱ्यापैकी असलात तर 'निवर्तले!' म्हणतात
बऱ्यापैकीचा साहेब गेला तर त्याचं 'निधन' होतं
त्याच्यावरच्या सायबाला 'देवाज्ञा' होते
जिल्हा पातळीवरच्या नेत्याचं 'निर्वाण' होतं...
आणि 'महान' नेत्याचं मात्र नेहमीच 'महानिर्वाण' होतं
...तर अशाच एक महान नेत्याच्या महानिर्वाणानंतरच्या
स्मशानभूमीतल्या शोकसभेत मला यमदूत भेटला...
...एखाद्या निमसरकारी-अर्धवेळ कारकुनासारखाच कळकटलेला

नाटकी आवाजात, कमावलेल्या अभिनयानं हुकमी गहिवरत
भाषणबाजी करणाऱ्या पुढाऱ्यांवर
यमदूताचे खट्याळ डोळे
फिदीफिदी हसत होते
म्हणाला, 'ह्या बेट्यांसाठी आमच्याकडं आता
नरकातसुध्दा सेपरेट सेक्शन खोलावा लागेल.'

झाडांवर कावळ्यांची गर्दी दाटलेली
एक कावळा हळूच यमदूताच्या खांद्यावर येऊन बसला
म्हणाला 'हॅलो!'...
बरंच वेगवेगळ्या तऱ्हांनी कावकावला आणि उडून गेला
नंतर यमदूत मला म्हणाला,
'हा उडाला तो आज गचकला त्याचा बाप
म्हणत होता... लेकराची चुकी झालीय फार
तरीही त्याला दाखवा थोडं तरी स्वर्गाचं दार'
'काहीतरी व्यवस्था करा,'
'पाच-दहा लाखांची चिरीमिरी देतो.'

...'पण छ्या:! असलं आपल्या बाच्यानं जमणार नाही.
हां! पण त्याला फक्त स्वर्गाचं दार लांबून दाखवायचं मी कबूल केलंय...
स्वीस बँकेत माझं खातं खोलून द्यायच्या वायद्यावर!'

मी तोंड कधीचंच उघडं टाकलेलं...
वरतीसुध्दा लाचलुचपत चालते?
दोन-पाच रुपयांची चिरीमिरी घेऊन डब्बलशीट सायकलवाल्यांना सोडून
देणाऱ्या पोलिसासारखा
निर्लज्ज हसत यमदूत म्हणाला,
'मृत्युलोकात व्हिजिटसाठी आल्यावर असेच चालते
भत्त्यात भागलं नाही तरी बिघडत नाही
आणि स्वीस बँकवाले
चित्रगुप्ताच्या बापालाही बँक अकौंट दाखवत नाहीत.'
■

## सहा हातांचं माकड

गांधीजी, तुम्ही
सत्याग्रह करून
उपोषणं करून
अहिंसेचा मंत्र देऊन
‘चलेजाव’चा नारा देऊन
स्वतंत्र केलेली ही मातृभूमी
आम्ही आता ठराव करून पुन्हा
पारतंत्र्याच्या उंबरठ्यावर आणून ठेवलीय.
अनैतिक संबंधांच्या सिरीयल्समध्ये
सारे रंक-राव रात्रंदिवस बुडाल्यावर
तुमचा गांधीवाद कुणी समजून घ्यायचा?
तुमच्या सोज्ज्वळ टोपीखाली आता लफडेबाज मेंदूंनी
बिनदिक्कत आसरा घेतलाय... गांधीजी !

पिझ्झा, बर्गर, कोक आता आमच्या
दारिद्र्यरेषेखालीही मुरू लागलाय
...दिवसा रस्ते झाडणाऱ्या बाईला
‘फेक’ आंतरराष्ट्रीय कंपनीचे
हजारो डॉलर्सचे बक्षीस लागल्याचे
बोगस मेसेज मोबाईलवर येऊ लागलेयत
आणि ती स्वप्नात मर्सिडीजच्या शोरूममध्ये पोहोचलीय

आमची दमछाक होईल इतकी शून्यं लिहल्यावरही
जो आकडा अपुराच रहावा... असे भ्रष्टाचार
बिनबोभाट होतायत.

आम्ही फक्त आमच्या कुटुंबाच्या नावावरचे
गॅस सिलिंडर पूर्वीप्रमाणेच मिळत रहावेत म्हणून

आमचं एकत्र कुटुंब रेशनकार्डावर फोडून
विभक्त करून घेण्यासाठी
अहमहमिका लावलीय

म्हाताऱ्या आईवडिलांना आम्ही 'एकाच घरात तुमची
चूल कशी वेगळी दाखवायची' याचं ट्रेनिंग देतोय,
गांधीजी...
पण तुमच्या शिकवणुकीची लस लागलेली ही पिढी
भाबड्यासारखे काहीतरी अव्यवहारी प्रश्न विचारत
रहाते, गांधीजी...
कुठल्या महाभागानं तुम्हाला इतकं साधं सरळ सोपं
रहायची दीक्षा दिली, गांधीजी...

वाईट ऐकू नका, वाईट पाहू नका, वाईट बोलू नका असा
संदेश देणाऱ्या तुमच्या त्या तीन माकडांनी तर
आता उच्छाद मांडलाय...

'वाईट ऐकू नका'वालं माकड कानावर हात ठेवून
आता वाईट बघतंय आणि वाईट्ट बोंबलतंय

'वाईट बघू नका'वालं माकड डोळ्यावर हात ठेवून
वाईटसाईट ऐकतंय आणि तेच रिपिट करतंय

'वाईट बोलू नका'वालं माकड तोंडावर हात ठेवून
कान देऊन वाईट ऐकत नुसतं बघत बसतंय

गांधीजी, तुम्ही
एकाच माकडाला सहा हात द्यायला हवे होते
म्हणजे दोन्ही कानांवर दोन हात

दोन्ही डोळ्यांवर दोन हात
एक हात तोंडावर आणि दुसरा ढुंगणावर

... पण, अशी कोणतीच आज्ञा न पाळणारी माकडं
आज सत्तेवर आहेत.
साम, दाम, दंड, भेदी असा अधिकार
त्यांचाच चालतो, गांधीजी...
काहीच न झाकणाऱ्या त्यांच्या हातांची किमया
हजार, लाख, कोटीत खेळतेय...

बापू, त्यांनी आमची पूर्णपणे मारलीय...
तरीही आम्ही सर्वसामान्य सारे
तुम्ही सांगितल्याप्रमाणं 'एका गालात थप्पड बसली तर
दुसरा गाल पुढं करा' या शिकवणुकीप्रमाणं
त्यांनी एकदा 'मारल्या'वर दुसरं काय पुढं करायचं
याचा विचार करतोय...
नव्या गांधीवाद्यांप्रमाणं एकमेकांशी भांडतोय...
मधूनच तुमचा पुळका येणाऱ्या आमच्या 'अण्णाबिण्णांना'
विचारत रोज रोज गुदमरतोय आणि आहे तिथंच 'स्टील' होतोय.

त्या अचल स्थिरावस्थेत आम्हाला सहा हात फुटल्यासारखं होतंय
आणि अदृश्यपणे आम्ही आमचे नाक, कान, तोंड
झाकून घेतोय...
■

## डायव्हर्शन

रस्त्यात बऱ्याच ठिकाणी
काळ्यापिवळ्या पट्ट्यांचे डायव्हर्शनचे बोर्ड

अश्मयुगातल्या महाकाय खेकड्यांसारखे
प्रचंड अर्थमुव्हर्स कुठं खोदाखोदी करतायत
कुठं माती उचलून भर घालतायत.

कितीतरी वर्षं मनातल्या पोरपणाला
भुरळ घालणाऱ्या टेकड्या
कांदा चिरल्यासारख्या कापून ठेवलेल्या
प्रवासात कमान करून रस्त्याच्या दुतर्फा
स्वागताला उभी असलेली हिरवीगार जुनी झाडं
अमानुषपणे हत्याकांड झालेल्या प्रेतांसारखी
रस्त्याकडेला दुतर्फा रानात पाडून ठेवलेली

मेलेल्या शिकारीवर रानकुत्र्यांनी ताव मारावा तशी,
माणसं झाडांची प्रेतं तोडून ट्रकात भरतायत

एक गर्दहिरवा वर्तमान होतोय इतिहासजमा
उद्याच्या वाळवंटांच्या स्वागतासाठी...
शीर तुटलेल्या मृत गावांच्या लोकगीतांसाठी

काळसर्पाची अजस्त्र कात पसरावी
तसा डांबरी हायवे उद्या या झाडांच्या थडग्यांवर पसरेल
आणि नवनवीन मॉडेलच्या अगणित गाड्या वारंमुंग्यांसारख्या
हायवेवरून धावतील
प्र-गतीच्या नव्या कमानी उभारण्यासाठी

आमचं उज्ज्वल भवितव्य टोल भरून घडविण्यासाठी

कंत्राटदारांच्या पोरांनी डान्सबारमध्ये नोटा उडवण्यासाठी
रेव्ह पार्ट्या करणाऱ्या सायबांच्या
पुढच्या पिढ्यांच्या राज्याभिषेकासाठी
भ्रष्ट अधिकाऱ्यांच्या बायकांची
सोन्यारूप्याची मिजास भागवण्यासाठी

चेहरा हरवलेल्या गावांचा
गर्दहिरवा इतिहास
पुसून जाताना
आणखी गरीब होणाऱ्या दारिद्र्यावर
घासलेटचा एखादा दिवा
कुणी तरी पेटवा रे!

■

# हत्येपूर्वी

तुमच्या कुऱ्हाडी परजणाऱ्या आवाजलहरींचा संदेश
कधीचाच मुरलाय माझ्या पाळामुळात

आता फार तटस्थतेनं ऐकतोय मी
माझ्या मृत्युगीतापूर्वीचं शोकसंगीत...

कायदे करणाऱ्या समूहभिरू उध्दट प्राण्यांनो,
तुमच्यासाठी थंडपणे ठोस कायदेशीर इलाज करणारा
तुमचा बाप... या डोंगरदऱ्यातून, नदी-नाले, अफाट
जलाशये आणि आसमंतातून नजर लावून बसलाय
...तुम्ही करू पाहत असलेल्या माझ्या निर्घृण हत्येकडे,
एखाद्या चिरंजीवी साक्षीदारासारखा
याची तुम्हाला तसूभरही जाण नसावी
याची मला राहून राहून खंत वाटते.

माझ्या हत्येनंतर तुम्हाला चुकवावे लागतील
सगळेच हिशेब... त्याच्या न्यायासनासमोर
...तुम्हाला सुनावल्या जातील सामूहिक शिक्षा
प्रदेशाप्रदेशानुरूप...
प्रलयंकारी पुरात बुडून मरण्याच्या,
एअर पोल्युशनच्या गॅसचेंबरमध्ये मरेपर्यंत घुसमटण्याच्या
भयाण वाळवंटात अथवा अवर्षणात
अन्नपाण्यावाचून टाचा घासून मरण्याच्या

पहा, पुन्हा एकदा विचार करा...
तुम्ही परवाच तोडलेल्या माझ्या एका फांदीवर
नव्यानेच कोवळा अंकुर फुटलाय
म्हणून म्हणतोय...
पहा, पुन्हा एकदा विचार करा.
■

## तू आता कोण झाला असशील?

तू आता मोर झाला असशील,
की गोगलगाय,
की सुरवंट...?

की एखाद्या वाघिणीचा बछडा,
की एखाद्या हरिणीचं पाडस,
की एखाद्या माशाचं, नाहीतर मगरीचं पिल्लू?

तू कोण झाला असशील...?

तू गेल्यावर
अंधाऱ्या कोपऱ्यातल्या
पालथ्या शिबड्याखाली पीठ पसरलेलं
पिठावर निरांजन मंद तेवणारं
शिंबड्याच्या असंख्य फटींतून
गूढ प्रकाशाच्या रेघा बाहेर पडलेल्या.
तुझी चिमुकली पावलं पुढच्या जन्मातली
त्या पिठावर उमटतील...
...आणि तू कोण झालायस हे आम्हाला कळेल,
असं कुणीतरी कुजबुजत सांगत होतं कुणाला तरी

तू किंगफिशरही होऊ शकतोस
किंवा किंग कोब्राही.
पण कसं कळायचं
तू कोण झाला आहेस...

तुला सारी सृष्टीच आवडायची...
...पण तू माणूस मात्र निश्चितच होणार नाहीस.
माणसांचा हल्ली तिटकाराच यायचा तुला.

समुद्राखाली बुडत चाललेली गावं बघितली की
तुझ्या डोळ्यांत समुद्र साकळायचा.

जंगलात तुटणारी आणि वणव्यात पेटणारी
झाडं बघितली की तुझ्या डोळ्यात अंगार फुलायचा.
जळफळायचास तू जंगल होऊन.

वर आभाळाकडं बघायचास
सूर्यास्ताचा फोटो काढताना...
कारखान्यांच्या चिमण्यातून
धुरांचे लोट बघून गुदमरून जायचास...

तुझी संवेदना तुला आमच्यातून घेऊन गेली
पण नव्या जगात कुठल्याही योनीत
तू जन्मलास तरी तुझ्यातला रसिक कवी
त्या त्या जीवांच्या भाषेत कविता निश्चित करेल
सकळांना शहाणं करणारी...

...तरी पण
तू आता कोण झाला असशील...?
तुला खूप भेटावसं वाटतं रे!
■

## भाषा १

भाषा तू बोललीच नाहीस
शब्द तू उच्चारलेच नाहीस
पण लहरत आलं गाणं तुझ्या डोळ्यांमधून मुक्यानंच
त्या प्रत्येक वेळी शब्दांनी वसंतोत्सव साजरे केले माझ्या उरात
भाषा घडवत आली संवाद तुझ्या-माझ्यात,
पुढाकारही तिचाच
तुझं-माझं जग एकमेकांत बेमालूम मिसळण्यात
त्यातही पुन्हा तू तुझं जग सावरतेस नेटकं
मी मात्र त्यात माझं जग धसमुसळून मिसळतो
या धसमुसळण्यात, या सावरण्यात,
डाव मोडता मोडता पुन्हा दुवा साधते भाषा.
तुझी-माझी भाषा.

भाषा तुझी-माझी
तशीच ती तो, ती, ते आणि त्यांची
मग संदर्भाबरोबरच बदलत जातात नाती आणि अर्थ
भाषेच्याच काळोखात चाचपडतात स्वार्थ परमार्थ

प्रत्येकजणच एक 'बंडल' झालेला
न उलगडणाऱ्या अर्थांच्या गुंतवळ्यांचं
त्यातले काही गुंते तू आणि मी
एकत्र बसलो सोडवायला
तुला-मला वाटलं, 'गुंता सुटला.'
आता कळतंय 'गुंत्यात तू अन् मीही गुंतलोय.'
'भाषा कशाला हवी?'
तरीही मलाच सारं कळाल्याची!
तसं केलं की सगळेच हसतात मोकाट
आणि हसायची लिपी नसते.

■

# भाषा २

भाषा घडवते प्रवास व्यवहारांचे
पण कधी मुक्कामाचे स्टेशन भेटतच नाही
नुसतीच भेटतात खडखडत स्टेशन्सवर स्टेशन्स
प्रत्येकवेळी आपण खिडकी उघडायची 'अर्थाची'
तर दुसरंच स्टेशन असतं अनोळखी,
धुक्यात गुरफटलेलं
आणि खिडकीबाहेर उभा असतो एखादा लालचावलेला
प्रशिक्षित ओशाळ अनाहूत दान मागणारा काळ होऊन
...संधी मिळाली तर, त्याचा नाटकी दुबळेपणा
क्षणार्धात पडणार असतो गळून
आणि त्यानं ओरबाडायचं असतं तुमचं नशीब सटदिशी
म्हणून घाईघाईनंच बंद करायची असते अर्थाची खिडकी

भाषा तुम्ही संपेपर्यंत सोबत राहते सदोदित
स्टेशनामागून स्टेशनं
मुक्कामाचं स्टेशन कुणीच बघितलेलं नाही आजवर

'प्रवास संपण्याआधीच टप्प्याटप्प्यावर प्रवासीच संपले आहेत!'
असाच भाषेचा आजवरचा इतिहास आहे.

■

## भाषा ३

भाषा उभारते प्रतिसृष्टी
तिचं खरं-खोटेपण शोधायचं असतं बोलणाऱ्यांच्या नजरेत

आता नजरेच्या डोहांची हमी नाही
डोहात गाळही काही कमी नाही

'कसं टाकायचं पाऊल पुढं?'
माझी नजर करुण!
तुझ्या नजरेत अचानकच
तरारते चमक तरुण

नजरेच्या भाषेवर पूर्वी वसंत फुलायचा म्हणे
आता तिथेही नाचत असते बेगडी फुलांचे गाणे

भाषेचा चष्मा लावून आता नजर चोरायची
नातं जपल्याची आपली आपणच समजूत काढायची
■

## हुकमाचे पान

बदाम चौकट इस्पिक किलवर
कोण असावा हिचा दिलवर
असेल कोणी खत्रुड बिजवर
काय करायचं रे तुला?
...अंदाज बांधायची सवयच असते
भल्याभल्या भलत्यांना

चौकट इस्पिक किलवर बदाम
असेल का याच्या खिशात छदाम
की मालामाल हा भरून गोदाम
काय करायचं रे तुला?
...अंदाजावरच तर खेळायची खेळी
प्रत्येक सोम्यागोम्याला.

इस्पिक किलवर बदाम चौकट
काही तरी इथं शिजतोय कट
पहिल्यापासूनच हा वाटतो हलकट
काय करायचं रे तुला?
...अंदाज चुकला तर फुका
फास आमच्याच की हो नरड्याला

किलवर बदाम चौकट इस्पिक
साधलंच पाहिजे आपलं ईप्सित
याच्याकडेच हुकूम निश्चित
काय करायचं रे तुला?
...कर्तब नसता, छानछोकी हवी
तर डाव लागलाच पाह्यजे मला!
■

# ट्रेनिंग

हे अश्वत्थाम्याऽऽ!
सुकल्या स्तनातून रोगांचा वारसा शोषत
ते रांगायला लागले

त्यांनी कधीच धरला नव्हता हट्ट दुधाचा
तरीही... डुकरांनीही खाल्लं नसतं ते पचविण्याची ताकद
हे अश्वत्थाम्या, त्यांना वारसाहक्कानं मिळालीय
...तुझ्या कपाळावरच्या प्रचंड स्वयंभू जखमेसारखी
पाण्यात पीठ कालवून दुधाची समजूत काढता येते पोरांची
हे त्यांच्या आयांनाही ठाऊक नाही

हे अश्वत्थाम्याऽऽऽ!
रस्त्याकडेच्या टीव्हीच्या दुकानात
दाखवल्या जाणाऱ्या इन्स्टंट खाद्यपदार्थांच्या जाहिराती
काचेबाहेरून आशाळभूतपणे पाहणाऱ्या
त्यातल्या चारपाच पोरांच्या निस्तेज म्लान वाटोळ्या डोळ्यांत
उजाडण्याआधीच संध्याकाळच्या लांब सावल्या पसरल्या आहेत

आणि तुझं नितळगूढ, चिरंजीवी प्रतिबिंबही डहूळलंय त्यांच्या डोळ्यांत

त्यांच्या आया त्यांना जन्माला घातल्यावर
लगेचच तेल मागत हिंडायचं
ट्रेनिंग देतात म्हणे...
■

## साभार परत

एखादी कविता
साभार परत यायची
तेव्हा...

मूल मधूनच शाळेतून
परत आल्यासारखं वाटायचं...

त्याचा धसमुसळेपणा
खरचटल्याची एखादी खूण
रपाटा खाल्ल्यानंतर
दाबून ठेवलेला हुंदका
अभ्यासातल्या कच्चेपणाची
शाळेची तक्रार
या सगळ्याचं ओझं
दप्तरात भरून आलेल्या
उनाड पोरासारखी...
एखादी कविता
साभार परत यायची,
दप्तर भिरकावायची
अपेक्षांचं.
आणि उड्या मारत पुन्हा
बाहेर पडायची
बंधमुक्त झाल्यासारखी
दबावालाच वेडावून दाखवत
■

## ‘‘असं ऊन कधी पडलंच नव्हतं!’’

‘‘असं ऊन कधी पडलंच नव्हतं!’’
माझ्या खापरपणजीची खापरपणजी
जमिनीला टेकणारं सुरकुतलेलं नाक
वर उचलून... भेलकांडतानासुध्दा
सावधपणे दारातनं बाहेर डोकावत
कापऱ्या आवाजात पुटपुटली तेव्हा...

एक मुसाफीर आपला वितळणारा चेहरा
टिचभर रुमालात सावरत सावलीच्या शोधात
लगबगीनं पुढं गेला...
त्याला माझं घर दिसलंच नाही.

बाहेर सगळीकडेच धुरकट पिवळं भगभगीत ऊन
पेटलेल्या वस्त्यांच्या ज्वाळाही उन्हानं गिळून टाकलेल्या
नुसताच जळकट गरम वास सुटलेला
दारातनं बाहेर डोकावत, मी माझ्या खापरपणजीच्या
खापरपणजीला काहीतरी म्हणालो... पण प्रतिसाद शून्य!

लगबगीनं मागं वळून बघतो तर....
म्हातारी कधीचीच गतप्राण झालेली
एक धुरकट पिवळा कॉन्संट्रेटेड कवडसा
दात विचकत म्हातारीच्या टाळूवर पडलेला

... म्हातारीच्या टाळूतून ‘जुन्या सोन्याच्या’ रसाचा गंजलेला
ओघळ उतारानं नागमोडी चाललेला...
मी हवालदिल... काळ सोकावतोय

दूरवर कुठंतरी उमरावाचा एक कलंदर वारस
कसल्याशा धातूची, अशा उन्हापासून बचाव करणारी,

विचित्र छत्री पाठीशी खोचून
वितळू घातलेल्या सॅक्सोफोनवर कसलीशी
अनाहूत हुरहूर लावणारी अस्वस्थ धून वाजवत बसलेला.
■

## जमीनदोस्त

माझ्या खांद्यावर वस्तीला आलेल्या पाखरांनो,
निवांत झोप घ्या.
या काजळल्या अंधारात माझ्या पानापानांचा
आडोसा करून...

या थर्थरीवर जाऊ नका
मी घाबरलो नाही.
मी गहिवरून आलोय आनंदानं
तुमच्या उरातली धडधड ऐकून
माझं पानन्‌पान लढवीन तुमच्या संरक्षणासाठी
आजची रात्र निवांत झोप घ्या!
...पण उद्या इथं थांबू नका!
दू ऽऽऽ र जा... कारण इथं उठणार आहेत
भावनाशून्य बर्फाची वादळं

दूर जा!
जिथं फुलल्या असतील हर्षाच्या बागा
आणि जिथं नसेल तुमच्या कंठाला अनामिक हुरहूर

थांबू नका इथं उद्या आळसावून, दोस्त!
नाही तर या पानगळीबरोबर
तुम्हीही व्हाल जमीनदोस्त
■

# अंधश्रध्द देव्हारा

हे खिन्न मना,
बाजार तमाचा
ओलांडिसी तू कैसा
तेजाची ठिणगी
विकत घ्यावया
किती मोजशील पैसा

या भिन्न खुणा
सांगती लोक
शोधण्यास जाता पत्ता
आत्म्यांच्या नावे
परमात्म्यावर
भुते चालवित सत्ता

हा छिन्न जुना
पिंजरा डुले
गाण्यावर मत्त पहारा
विकार नांगी
जगण्यावरती
अंधश्रध्द देव्हारा
■

# बुजगावणं

बुजगावण्याला अचानक येते जाग
भिरभिरते गोफण
आदळतात पोपटी पिकांवर
हाकाऱ्यांचे आवर्त
आणि अवघं पोपटी रानच
आभाळात झेपावतं कलकलत
क्षितिजापार निषेध नोंदवत

उठलेलं रान असंच कधीतरी
बेमालूमपणे
उभ्या पिकांत मिसळून जातं पुन्हा
तेव्हा तिथली पिकं अधिक पोपटी
अधिक तजेलदार होतात...
...तिथलं बुजगावणं मात्र
गाफील असावं लागतं
मग तुम्हाला पिकांचा
कुजबुजाटही ऐकू येईल.
■

## फॅशन

माझ्या पँटवर
माझ्या बापाच्या लेंग्याची
जरासुध्दा नाही छाप

आणि बापाच्या लेंग्यावर तरी
त्याच्या बापाच्या धोतराचा
कुठं होता ठसा!

फॅशन म्हणजे
संशोधनाचं बायप्रॉडक्ट
रानात हागायला बसावं
आणि सापडावा ससा
फॅशनचा जन्म
अगदी तसा

बटन-गुंड्यांचे कारखाने नव्हते
म्हणून बसायची आज्याच्या धोतराला गाठ
आणि चेनच्या फॅक्टरीनं लावला
बापाच्या बटनगुंड्यांना नाट

स्वाभिमानापोटी देशप्रेमासाठी
विलायती कापड झालं आगीत फस्त
आता त्याच विलायतेत आमची तरुणाई
टॅलेंट विकण्यात व्यस्त

जशी फॅशन येते फिरून फिरून
तसंच विचार-तत्त्वांचं चालायचं समजून
कालचं चूक आज बरोबर
कालचं सुख आज अगोचर

तिथला व्हिसा म्हणजे नशीब फळफळतं
इथल्या भ्रष्टाचारात हल्ली टॅलेंट होरपळतं

कालचा स्वाभिमान आज ओमफस्
'विश्वाचं घर' करणाऱ्या तुक्याचाही लागतो कस

तुकोबाच्या धोतराला ग्लोबल चेन
'देशीवाद' घालणाऱ्यांची परदेशात चैन.
■

# कबुतरखाना

माझ्या कबुतरखान्यात
कितीतरी कबुतरं 'गुटुर्र घूंऽऽ' घुमताहेत्...
सांभाळून ठेवलीयत् कप्प्याकप्प्यात
या माझ्या कबुतरखान्यात...

एक कबुतर आहे मैत्रीचं
त्याला मी दाणे घालत असतो अक्षय प्रेमाचे
ते सदैव घुमत असतं आपल्याच तालात
या माझ्या कबुतरखान्यात...

एक कबुतर आहे सग्यासोयऱ्यांचं
ते मात्र मारत असतं चोच, पिसं फुलवून तोऱ्यात
दाणे घालणाऱ्या हातांवरच...
कर्तव्य म्हणून त्याला घालावाच लागतो खुराक
या माझ्या कबुतरखान्यात...

एक कबुतर आहे सामाजिक जाणिवांचं
त्याला काय खायला घालू?
काहीही घाला... ते उघडायचंच नाही चोच
...आता तर त्याची चोचच उघडी पडलीय
ते पडलंय उपडं... थंडगार... भावहीन... निश्चल
सताड डोळे... ताणलेले पाय... निस्तेज काया
गावागावातून सुटलीय त्याच्या चर्चेची दुर्गंधी
आणि मरून चाललीयत साथीतल्या रोगासारखी
सगळ्यांच्याच कबुतरखान्यातली सामाजिक जाणिवांची
शुभ्रपांढरी कबुतरं.

... आणखी एक कबुतर होतं तुझ्या-माझ्या नजरबंदीचं
ते मात्र कधीचंच सटकलंय हातातून
आणि जाऊन बसलंय

उंच इमारतीच्या टॉवरवर
मी कधीचा डोळे लावून बसलोय
ते खाली येईल म्हणून...
मग मी त्याला बंद करीन माझ्या कबुतरखान्यातल्या
खास गुलाबी कप्प्यात.
आणखी एक कबुतर आहे गिर्रेबाज
सारखं आभाळातच झेपावायचं
कालच मी त्याचे पंख छाटले
त्याला जमिनीवर चालायचा सराव व्हावा म्हणून

आणखीही एक आहे... पण जाऊ द्या...
...काय आहे, अशी कितीतरी कबुतरं आहेत
माझ्या कबुतरखान्यात... शौकच!
ही कबुतरं कधी कधी भांडतातही खूप एकमेकांशी
एकमेकांशी लगट करत कधी कधी दिवसेंदिवस
एकमेकांच्या मागे मागेही फिरत असतात...

कधी कधी ही सगळीच कबुतरं मी आकाशात उडवतो
उंच उंच जातात बेटी...
ती अशी उंच भरारत असतात ना, तेव्हा
खूप हलकं हलकं वाटतं...
मी नुसताच त्यांच्याकडे बघत असतो परकेपणानं
सगळं भान विसरून...

...पण नंतर बेटी हळूच एक एक उतरतात
अलगद फडफडत... पिसं उचकवत
मग पुन्हा भरतो कबुतरखाना
मनाच्या प्रत्येक कप्प्यात रात्रंदिन आम्हा
गुटुर घूं ऽऽऽ गुटुर घूं ऽऽऽ गुटुर घूं ऽऽऽ !
■

# चौकट

चौकटीतून आत येताना
किती गर्दी
आत आल्यावरही
किती अडचण

आत आत जाताना
पुन्हा भेटत राहतात
चौकटीमागून चौकटी
वेगळ्या संदर्भात
खुज्या खुज्या होत जाणाऱ्या

चौकटी संपत नाहीत
मी मात्र होत जातो खुजा
हरएक चौकटीबरोबर वाकता वाकता

शेवटी जिथं थांबतो तिथंही
एक चौकट
काय काय बसवायचं
याच विवंचनेत
अडगळ तशीच ठेवून देतो
चौकटीत...
चौकट पुन्हा लहान
आणि मीही खुजा
अडगळ कवटाळून

आता अडगळ चौकटीबाहेर डोकावतेय
आणि मीही होतो
त्या अडगळीचाच एक भाग

चौकट डोळ्यात साठवत
मी मिटून घेतो डोळे
तेव्हा माझ्या दडपलेल्या छातीला
श्वासांचे ठोठावणे असह्य होऊ लागते
डोळे आणखी आत आत पाहू लागतात
...आणि आपसुकच
मिटल्या डोळ्यांच्या पापण्याआड
चौकट भव्य भव्य होत जाते
आणि माझं अडगळलेपण
ठिपका ठिपका होऊन जातं... आसमंतात
मग कधी तरी
भोवतीची चौकट लुप्त होते.
आणि मी निराकार
...चौकटींचं वर्तुळ झालेलं
त्या क्षणभर समाधीनं
धीर दिलेला असतानाच...

डोळे उघडता उघडता त्या
वर्तुळाला पुन्हा
कोपरे फुटू लागलेले
■

## सौदागर

तुमच्या बाजारात पायाला चक्रं बांधून
भणभणा भटकलोय मी...

फिरताना लक्षात आलं
बाजारात तुम्हीच सगळे बसलाय
... सौदागर म्हणून
आणि तुम्ही सगळ्यांनी मलाच मांडलंय बाजारात
तुमच्या पध्दतीनं सजवून
एरवी ओळखीचं हसताना विलग होणारे तुमचे ओठ
फटाफट आकडे बोलतायत माझ्या लिलावाचे.
तुमच्या फायद्याच्या ऐपतीप्रमाणं.

मला उगाचंच अचेतन झाल्यासारखं वाटतंय...

तू पण बसलीय्स कोपऱ्यात?
सावलीतसुध्दा तुला छत्री लागते?
...अगं तुझ्याजवळ तर मी माझं आपलेपण, माझं सर्वस्व
ठेव म्हणून दिलं होतं...

असू दे ऽऽ, माणसाची वेळ असते...
निदान एवढं तरी कळू दे, काय दर लावलायस माझा?
■

# रविशंकर

दूरदर्शनचा पडदा
रविशंकरची सतार
तल्लीन चेहरा
भावूक पाणावले डोळे
उदास हास्य

खोलीभर सुरांचे घोस लगडलेले
मंदिरातल्या विरक्त शांतीसारखे
...तरीही स्वच्छंद

संवेदक नाजूक कलामयी बोटे
तरल लहरती सतारीच्या तारांवर
एका अनावर लयीत
...लय ...नाद ...सूर ...ताल ...
माझेपण विसरलेला मी
सुरांचा एक गुच्छच झालेला!

...आणि अचानक
ध्वनिक्षेपक म्यूट
...मग नुसतीच दिसत राहतात
अनावर नाजूक बोटे लहरताना मुक्याने
आणि स्वरनिर्मितीच्या वेदनेने एकाच वेळी
व्याकुळ अन् हर्षित झालेला रविशंकरचा चेहरा
नुकत्याच प्रसूत झालेल्या मातेसारखा

खोलीभर वाढत जातो गोंगाट
वाढत जातं रवंथ...
चघळून चघळून चोथा झालेल्या विषयांचं

रविशंकर मात्र गुदमरत चाचपडत असतो
सतारीच्या तारांवर
सुरांचे गुच्छ... अनिवारपणे

आणि मी?...
मी वेचीत असतो मूकपणे
विखुरलेले स्वरांचे घुंगूर
रविशंकरच्या तन्मय चेहऱ्यावर ...

■

## कोऽहम् ?

'कोऽहम् ?'
प्रश्न अचानक
उल्का पडावी चांदणभरल्या आभाळातून... तसा

पुन्हा काही घडलंच नसल्यासारख्या
सगळ्याच चांदण्या चमचमत राहतात
त्यांच्या चमचमण्यालाही तसा नसतोच अर्थ बऱ्याचदा
आमचं जगणं... नेहमीचंच.... तसंच त्यांचं चमचमणं!
त्यांना कुठून तरी गुरुत्वाकर्षण
आमचीही तशीच वणवण

'कोऽहम् ?'
होत राहतो उल्कापात... अधूनमधून
....एखादा संपवतो आपली इहयात्रा...
संदर्भ टाकून गुरुत्वाकर्षण आपोआपच गळून पडतं चहूबाजूला
भक्क पिवळ्या गप्पांच्या कोंडाळ्यात
चितेवर कुणी जळत जातं
आणि चाळवत जातात भलभलत्या 'भुका' ज्याच्या त्याच्या
त्याचवेळी पुन्हा एकदा अचानकच, ज्याच्या त्याच्या अंधारावर
एक ओरखडा उमटत विझत जातो... 'कोऽहम ?'

हळूहळू वाढत जातं वय
वाढत जातो गोतावळा... टकलाचा परिघ वाढवत
तसा अंधारही वाढत जातो ज्याचा त्याचा ...
अंधारात टिमटिमणाऱ्या प्रश्नांच्या चांदण टिकल्याही
...कधीतरी ...एकांडं चालताना
त्यातल्या 'कोऽहम् ?' च्या टिकल्याच पटकन् पडत असतात
म्हणूनच, 'उल्का पडताना पाहिल्याचं', सांगायचं नसावं कुणाला.
■

## हातामध्ये धरला टाक

हातामध्ये धरला टाक
गिरवत गेलो अक्षर अक्षर
दौतीमधल्या निळाईला
फुटला पान्हा अक्षर अक्षर
आभाळी रंगांची पाखरं
कागदावर नाचू लागली
अर्थामधल्या आनंदाने
डोळ्यांची पाखरं वाचू लागली
निळेपणात दडले होते
रंग किती, कसे सांगू
ज्ञाना, चोखा, तुकोबा तर
पोर होऊन लागले रांगू
बाळपणातच गळून पडले
अज्ञानाचे अवघे लक्तर
दौतीमधल्या निळाईला
फुटला पान्हा अक्षर अक्षर
अक्षर अक्षर वेचित गेलो
नश्वरतेचे आले भान
पेन घेऊन पेरत गेलो
अन् शब्दांचे फुलले रान
■

# पाखरांना वरून आदेश

पाखरांना 'वरून' आदेश
भर मोसमात गाणी न म्हणण्याचे
आणि वाऱ्यांना वरून बंदी
गंधित होऊन वाहण्याची
तेव्हापासूनच तू रंगवत असलेलं चित्र
अपुरं असल्याचं सांगण्यात आलं होतं खवचटपणे

कधी कधी तू रंगवत असलेल्या चित्रातल्या पाखरांना
मनमोकळं गाण्यासाठी कंठ देऊ शकत नाही याची खंत वाटते
...आणि तुझ्या चित्रातल्या मोसमातला फुलगंध
रानभर करण्यातही मी असमर्थ...
माझ्या नेभळटपणाचीही मला नेभळट चीड येते

पण जेव्हा तू तुझं अपुरं चित्र दालनात मांडतेस लिलावासाठी
आणि त्याच्यातील खुब्या खुलवून सांगतेस
आपल्या रसिक ग्राहकांना
जे सदैव चित्रातल्या बहरांवरूनच भविष्य पाहतात
अशा वेळी माझ्या अस्तित्वाची मला शंका येत राहते
...तू मात्र शंका-कुशंकांच्या पलीकडे
तुझ्या नव्या चित्रात गाणारी पाखरं कशी असतील
आणि कसे असतील बहर सुवासिक फुलांचे
याची चर्चा उत्साहात करत राहतेस

कदाचित माझं पिंजऱ्यातलं जिणं तुला मान्य नसावं...
किंवा पिंजऱ्यात असूनही अजूनही मला पंख आहेत
हेही अमान्य असावं
तुझ्या डाळिंबी हसऱ्या ओठांवरून
कोणतेच अंदाज बांधता येत नाहीत.

■

# मोर

## १

मोर नाचला असा
नाचला असा
नाचला मोर ऽऽ
आषाढ बनावर आले
धावुनी नभ वेडे घनघोर

## २

मनी दाटुनी येतो सांजलवेळी
शिशिरामधला मोर
पिसा होऊनी पिसे शोधतो
रानी सांडली दूर
अंधार घालतो मिठी
घुसमटे मोर... अन्
चांदणेही फितूर

## ३

झाडाच्या फांदीवरती बसला
सजून पहाटे मोर
ढाळून पिसांचा भार
...शिरशिरे झाड
रानातून असूया साऱ्या
ल्यायले झाड आभूषण
पाचू-हिऱ्यांचा हार
■

## देहधर्म...

आदिम काळापासून
धर्म-अधर्माचे सारे संकेत बाजूला सारत
देहधर्म वेळोवेळी बदलत आलाय प्रत्येक धर्म
कारण धर्मांचा पायाच घालत आला आहे देहधर्म

धर्मस्थळातले धर्म
नीतीच्या गप्पांना
अनीतीच्या झालरी लावतात रंगबिरंगी
आणि वावरतात दिमाखात
...लक्षावधींना अनैसर्गिक मृत्यूच्या कराल दाढेत
देणाऱ्या फसव्या दानशूरांसारखे धर्म...

आता प्रत्येकजण सांगू लागलाय
धर्म माझा वेगळा!
आणि जाती-पोटजाती झाल्या आहेत
डोईजड...धर्मबुडव्या

म्हणून देहधर्म, बदलत आला आहे आपला धर्म
श्रध्दांना फाटे फोडत.
आता श्रध्दाळू फाट्यांवर
लालसांचे चकवे,
धर्मस्थळे झाली आहेत
उल्हास वाढवणारी पर्यटनस्थळे
आणि श्रध्देच्या कोंबावर फुलले आहेत
चटपटीत पॉलिशवाले विलासी बाजार

विज्ञानाचा वापर अनिष्टतेचे
जतन करण्यासाठी...
आणि माणूसपणाचा भोळसट उपयोग

दर्शनाच्या रांगेत...
गैरसमजात चिणून मरण्यासाठी
ज्याच्या त्याच्या धर्मभावनेसकट.

...तरीही देहधर्म
रोज बदलत असतो प्रत्येक धर्म सोयीनुसार
अपेक्षांवर आधारत,
प्रसंगी विज्ञानावर जरब बसवत
विचारांचे खून पाडत,
माणूसपणाचा हक्क हिरावत,
प्रांजळ प्रेमावर बलात्कार घडवत
माणसाला श्वापदांची
तीव्र इंद्रियभूक देत
वासना आणि स्वार्थच असतात
कैकदा धर्म... देहधर्मासाठी.

सत्य-असत्य, पाप-पुण्याचे
संदर्भ धूसर होतायत धर्मांध धूळदाणीत
धर्म-अधर्मामधल्या भिंतीही
भुईसपाट क्षणाक्षणाला
आत्म्याचं अमरत्व
धर्मग्रंथात गहाण
आणि धर्माच्या कर्कानि ग्रस्त झालेली
सृष्टी रोज देहाला भाग पाडते
धर्म बदलण्यासाठी...
धर्म मोडण्यासाठी आणि
दंभाचा दर्प भपकारत
एकमेकांच्या धर्माधर्मातले झगडे

तीव्र करण्यासाठी...

आता आपणच ठरवायला हवं
निसर्गाला अनाठायी तुडवत
किती उत्क्रांत व्हायचं ते

उतू गेल्यानंतरही आता
किती उत्क्रांत व्हायचं आपण?
■

## उन्ह सोनेरी...

उन्ह सोनेरी पडक्या दगडी भिंतीवरती
उन्ह सोनेरी तांबूस हिरव्या पानांवरती

उन्ह सोनेरी नितळ सावळ्या रस्त्यांवरती
उन्ह सोनेरी भिजून थिजल्या वस्त्यांवरती

उन्ह सोनेरी फुरफुरत्या स्थिर पुतळ्यावरती
उन्ह सोनेरी चुळबुळत्या कठपुतळ्यांवरती

उन्ह सोनेरी भिजून थबकल्या पंखांवरती
उन्ह सोनेरी खोल अनामिक डंखांवरती

■

## फुलांना फुलू दे

फुलांनी फुलायचं
तुम्ही आम्ही खुडायचं
हे काही बरं नव्हे
फुलांना फुलू दे
पानांतून उलू दे
तिच्या केसांत त्यांचं फूलपण
कशासाठी गुदमरूदे ?
मेल्यावरही फुलांनी हसावं टवटवीत
माळा त्यांच्या प्रेतांच्या माळाव्यात आम्ही घवघवीत...
कशासाठी ?
फुलांना फुलू दे
फांदीवर झुलू दे
हवं तसं डुलू दे
अन् आकाश, डोंगर, नदी-नाल्यातल्या
साध्यासुध्या परमेश्वराला
मोकळेपणानं हसू दे
फुलांना फुलू दे
पानांतून उलू दे
फांदीवर झुलू दे
■

## प्रिय

तू गेल्यावर
कळून चुकले अवघे सारे
नश्वर आम्ही
तुझ्यात लपले ईश्वर सारे

तू गेल्यावर
दारावरल्या जुईफुलांनी
हुंदके आवरून हळूच केली
स्मृतिगंधाची हृद्य शिंपणी

तू गेल्यावर
जाण्या-येण्यामधले अंतर
श्वासा-श्वासामध्ये भेटती
मैलाचे जणू दगड निरंतर

तू गेल्यावर
असा अचानक होऊन वारा
आत्म्याच्या चिमटीत धुंडतो
व्यवहारी देहाचा पारा

तू गेल्यावर
आत्मे सारे समुद्र झाले
मौनामधली आर्त प्रार्थना
रिते रिते वाळवंट झाले

■

## शहारा

हा कशाचा शहारा
अंगभर फुलून आला
आणि भाल्यासारखा उभा ठाकला
अंगावरचा केस न् केस

कोंबडं आरवायच्याही आधी
खिन्न अपरात्री आकांतानं कलकलणाऱ्या कोकिळेला
...कसं आवरायचं

हा कशाचा शहारा...
अंगावर बाभुळबन पसरवतोय.

पात्रतेची लढाई
रोज लढता लढता
होश उडालेली नियत
अनाहूत बेछूट हल्ला चढवते
स्वत:वरच
प्रत्येक जखमेच्या खड्ड्यात
बेजान झालेल्या संगिनींचा खच
आणि रक्ताचा प्रत्येक थेंब
स्फोटकांचं गोदाम बनलेला
अशा हल्ल्यातून काय साधलं जातंय
कशाची जीत कुणाला हरवतेय

जिवाजिवांची मनं...युध्द क्षेत्रं
अंदाधुंद संशयाची वावटळं घेऊन फिरणारी
शहाऱ्यांचे भयोत्सव
जिवाजिवांच्या रोमारोमात

उद्या ह्याच कुजलेल्या शहाऱ्यांचं
भयगंडाला खतपाणी होऊ नये म्हणून
ह्या धाबडधिंग्यात
उरातला अभंग
जपावा लागेल...

रखरखत्या उन्हात
आंब्याच्या दाट सावलीत
कोकिळेच्या कंठात
मेघमल्हार फुलावा म्हणून
उरातला अभंग
जपला पाहिजे.

■

## कोंडी

भय
भरलेले
भवती

श्वास
मोकळा
नाही

पक्ष्यांच्या
गाण्यामध्ये
पिंजऱ्याची
ओवी येई

दाणा दाणा टिपताना
आवंढाच लावतो तोंडी
अन् तहानला पाणवठा
प्रतिबिंब जिवाचे कोंडी...
■

# संध्याकाळ

शब्द-नि:शब्दांच्या वेंधळ्या क्षणी
ती आसमंतभर गोरज उधळत असता
आनंदाने पिसावून...

...तो मात्र
एखाद्या तेजस्वी बलदंड पराक्रमी योद्ध्याने
प्रियेला पाहताच लाजेने थिजून जावे तसा...
मावळतीला आरक्त होऊन घुटमळत असतो.

...नकळत
त्याचे आग ओकणारे हात कनकाचे होऊन जातात
आणि.... तिला हळुवार कुरवाळण्यासाठी...
त्याची नजर अतिव स्निग्ध झालेली असते
तिच्या वक्षांमध्ये चेहरा लपवून घेताना.

...ती त्याला आलिंगन देते स्नेहार्द्र
आणि हळूच लपेटून घेते चांदण टिकल्यांची
अंधाराची शाल भोवताली

■

## कडेलोट

तृषित लोचनांना मृगजळ
तशी तू उभी

मनाचे अरबी घोडे
चौखूर उधळतात
आयाळ विखरून

शक्य आहे, शेवटपर्यंत
ते असेच पळत राहतील
ऊर फाटेपर्यंत

बुजत चाललेले दिशांचे संकेत,
क्षितिजरेषा अंधार चुंबताना
मनाचे उमदे घोडे
सुसाट... दिशाहीन...

आंधळा वेग नसानसात
ऊतू जाताना
टापा वाटांचे भान विसरल्या
तुझ्या मधुर पाण्याचा झरा
मिळतच नाहीये धपापलेल्या
मनाच्या अबलख घोड्यांना

■

## कलाकुसर केलेलं गोंडस शून्य

नखाएवढंसुध्दा उणं नाही बघा!
सगळ्या नुसत्या बेरजाच बेरजा
समस्तांच्या कल्याणाच्या

मात्र, इथे कुणाच्या इस्टेटीच्या
गुणाकारांच्या गुणाकारांना गुणलं जातंय
कोटी कोटी हाडामासांच्या इस्टेटींना भागून

मग मांडली जातात मालमत्तेची गणिती सूत्रं
अमूक कोटी रु. (क्ष) + अमुक अब्ज (य)
आणखी असेच हाताच्या बोटावर मोजता येतील असे
अधिक... उरलेले समस्त शून्याशी नातं सांगणारे
आणि या सूत्राची बरोबरी केलेली असते
एका भल्यादांडग्या गोंडस शून्याशी

यातले 'क्ष' कोण? 'य' कोण?
आणि असे बरेच गुलदस्त्यातले कोण?
हे फक्त त्या काळ्या लक्ष्मीच्या दारात
मुकादमी करणाऱ्या शासकांना आणि
शासकांच्या द्वारपालांनाच ठाऊक

आम्हा समस्तांना कौतुक असतं
फक्त त्या गोंडस शून्याचं
त्या शून्यालासुध्दा असते...
कलाकुसर केलेली आशेची
■

# धुकं...

या शहरात
साऱ्याच वाटा बुजत चालल्यायृत
अपरिहार्य धुक्यात
दूरपर्यंत पसरत चाललेत धुक्याचे लोट

हातावरच्या माणसाचा मुखवटासुध्दा
ओळखत नाही, मग त्याच्या डोळ्यातील भाव कसा समजणार?
सगळेच चाचपडतात एकमेकांना
स्पर्शबधिर हातांनी

कुणालाच आठवत नाहीत परस्परांचे संदर्भ
फक्त आठवतो आंधळा लिंगभेद!
आणि मैथुनमग्नतेने सगळेच रंगवतात
जुना मुखवटा नव्या रंगात
पुन्हा पुन्हा मुखवटे फाटले तरी
मुखवट्यावर रंगरंगोटीची पुटं चढवली जातातच
सतत... सातत्याने...

सगळ्यांनीच आपला आत्मा लिंगभावात
जन्मत:च लिलावून टाकलेला धुक्याशी
आणि सगळेच सामील झालेले
धुकाळ वाटेवरच्या दिशाहीन मुसाफिरांच्या कळपात...
■

## माती

मी माती, तू माती, सारी दुनिया माती माती
या मातीतून चैतन्याचे झरे वाहती गाती

चंद्रही माती, माती चांदणे, मातीची नक्षत्रे
इथे तिथे फिरती ही सारी या मातीची गात्रे

गंध मातीचा घेऊनी आली रंगबिरंगी फुले
फांदीफांदीवर मातीचे किलबिल गाणे झुले

ही चमत्कृतींची दुनिया सारी या मातीची किमया
तुझ्या नि माझ्यामधली नाती या मातीची माया

तू माती, मी माती, तरीही तुला मातीची आण
घाल गवसणी आभाळा परि पाय मातीचे जाण...

■

## चांदणं

चांदणं लाही लाही
देहाकाठी मदनवारा
भिर्भिर आत्मा अपरात्रीला
जसा नभातून अनाम तारा

चांदण्यात विझे धुकं
चित्कारे पाखरू मुकं
एका स्मृतीपाशी उभी
तिच्या सावलीची चूक

तळ्यातल्या चांदण्यात
सळसळते झाड जुने
तिच्या वाटेवरी साधू
पानोपानी त्याचे गुन्हे

आत्मा हो तल्लीन
चांदण्यात भिजे म्लान
त्याच्या रूध्द कंठातून
उमटले दिव्य गान

गाण्याच्या स्वरांतून
चांदण्याचा दहीकाला
सुराभोवती पहारा
प्रहर अवघा ताल झाला
■

## अमजदअली...

आत्ता मी तुझी किरवाणीतली
विलंबित लय ऐकतोय...
दुःखाचा कोमल सुकुमारपणा तुझ्या सरोदवरील बोटांतून
जादूसारखा माझ्या कानांत... कानांतून धमन्यात
धमन्यातून साऱ्या शरीरभर अलवार झंकारतोय...

अमजदअली, दुःख किती सनातन आहे रेऽऽऽ!
असाच छेडत रहा...
तू दुःख छेडतोयस पण तुझ्या आर्त स्वरांनी
माझ्या रोमारोमात
सुखाच्या कोवळ्या पालवीचे
धुमारे फुटू पहातायत...

डोळ्यातला थेंब मध होऊन साकळलाय माझ्या पापण्यांत
हुंदक्यांवर उदात्ततेच्या धुपाचा गंध रेंगाळतोय
अनाहूतपणे मी किती मोठ्ठा होत चाललोय तुझ्या स्वरार्ततेनं
या रोमांचांबरोबर... मला सांगताही येत नाही...अमजदअली!

तुकाराम, ज्ञानेश्वर, नामदेव, चोखोबा, गोरोबा, कबीर, नानक, जोतिबा,
गांधी, बाबासाहेब, मार्टिन ल्यूथर किंग, अब्राहम लिंकन, कार्ल मार्क्स,
मदर तेरेसा, अण्णाभाऊ, बाबा आमटे, मेधा...
अशा कितीतरी माणसांच्यातलं माणूसपणाचं उदात्त दुःख
साजूक तुपासारखं तुझ्या स्वरांतून माझ्यासारख्या
चौकटीत अडकलेल्यांच्या मनात झिरपतंय!

अमजदअली... तू असेच छेडत रहा स्वरांचे आवर्त
आणि माझ्यासारख्या कलहग्रस्त बहुजनांना असाच
सनातन दुःखाच्या सुखमयी दुलईत लपेटून घे!

■

## मरणपालखी

मेलेल्या गावातून
मीच घेऊन चाललोय
माझ्या मृत्यूची पालखी

माझ्या मरणपालखीला खांदा देणारा
प्रत्येक खांदेकरी मीच,
एखाद्या षड्यंत्राचा भाग असावा तसा

पालखीच्या पडद्याआडून निरखतंय
या मेलेल्या गावानं उभारलेल्या यंत्रकमानी
माझं टक्क थिजल्या निस्तेज डोळ्यांचं प्रेत
...या कमानी केवळ माझ्यासाठी नव्हत्या
अशा किती तरी पालख्या माझ्या मागे पुढे असणार.

एक छोटासा धक्का लागून
पालखी गचक्न थांबते
पडद्यातून एक अनाहूत हात आत येतो
आणि माझ्या सताड डोळ्यांवरच्या
अंधारपापण्या मिटवून टाकतो.

अंधाराच्या खोल गर्तेत गुदमरत जाता जाता
समाधान एवढंच
मेलेल्यांच्या डोळ्यांवर
अंधाराचं कातडं ओढणारे जिवंत हात
या गावात अजूनही शाबूत आहेत.

■

# खुळखुळा

खुळखुळा
वाजत राहिला
हात हालत होते तोपर्यंत

हळूहळू त्यातलं खुळेपण
समजत गेलं
हात हलायचे थांबत गेले

खुळखुळा
वाजायचा बंद होत गेला
डोकी शांत शांत होत गेली

खुळखुळ्याची
टवाळटकळी
आता कोपऱ्यात निरर्थक पडलेली असते.
कधी त्याचा रंग, आकार
आजही भुरळ घालतो...
पण मनात दडलेला त्याचा कर्कशपणा
त्याला हातात घेऊ देत नाही

कधीतरी अचानक कोपऱ्यातला
खुळखुळा जागेवर हलतो वाऱ्यानं
आणि अनाहूत वाजतो लक्षवेधक
...तेव्हा नजरेच्या कोपऱ्यात
आता त्याची अडगळ झाल्याचा भाव असतो...

■

## आव

सारं जग समजल्याचा आव आणत
माझ्या श्वासांचं वादळ
मी तिच्या केसांत माळलं

सारं सोसल्याचा अपवाद सांगत
माझ्या अक्षम्य कण्हण्याचे प्रतिध्वनी
मी तिच्या कानात बांधले

साऱ्या साऱ्यांचा साक्षीदार म्हणवणारे
माझ्या डोळ्यांचे सताडपण
मी तिच्या दगडमनावर कोरले

आता मी माझी श्रध्दा
तिच्या कणाकणात शोधतोय
आणि तिने मात्र
आदिमायेचा आव आणलाय.

■

# विसर विसर विसर

तेरवाचे परवाचे कालचे आजचे आत्ताचे सारे विसर
विसर विसर विसर विसर, विसर विसर विसर ।।

विसरण्यासाठीच जन्म आपुला, सोडायची नाही कसर
राग लोभ मोह माया करुणा प्रेम आणिक मत्सर
नको लावूस विसरण्यासाठी श्रध्देचेही अस्तर
विसर विसर विसर विसर, विसर विसर विसर ।।

धर्माची गोची कर्माची नीची वर्माची धच्ची विसर
देवळात जा पाप्यासारखा, देवाला सांग 'निस्तर!'
वाजवून घंटा, बोलून नवस, तोही नंतर विसर
विसर विसर विसर विसर, विसर विसर विसर ।।

बांधिलकी विसर, फुशारकी विसर, आत्म्याचा आवाज विसर
सारे बघूनही चाचपडायचेच... दृष्टी होते जशी धूसर
लोकांची 'शाही' घसरगुंडी... आंधळ्या आकांताने घसर
विसर विसर विसर विसर, विसर विसर विसर ।।

नकोत नाती खाणारी गोती, मैतर-बैतरांचे अडसर
खोबऱ्यापाठी इकडून तिकडे हात तू बेशक पसर
कायबी कुठंबी कुणीबी कसंबी कुणावर न्हाई असर
विसर विसर विसर विसर, विसर विसर विसर ।।

मत विसर पत विसर त्यामुळं झालेली गत विसर
मोठ्ठा धक्का लक्षात पक्का राहतो कुठं? पडतोच विसर
झुगार सारे सारे जुगार... भुलवणारी कलाकुसर
विसर विसर विसर विसर, विसर विसर विसर।।

विस्मरणाचा महिमा मोठा... हरघडी पडतो विसर
विस्मृतीच्या गर्तेत बुडाल्या, कैक संस्कृती परस्पर

तेरवाचे परवाचे कालचे आजचे आत्ताचे सारे विसर
विसर विसर विसर विसर, विसर विसर विसर।।

■

## मन

१

मन नदीचं रे माझं
त्याला दोन दोन काठ
ऐल राहून पडेना
पैलतीरासंगे गाठ

खुळं ऐल मन ऐके
देवाचारी पैल कथा
परि सोडवेना त्याला
त्याची साधीसुधी व्यथा

कधी बुडवितो तुका
माझ्या डोहामध्ये गाथा
ऐल गोंधळाचा माझ्या
पैलावर भगवा जथा

ऐल गातात कोकीळ
मेघमल्हाराचे सूर
पैल नाचणारा मोर
झाला समाधीत चूर

ऐल पैल सांधताना
मीच झालो वाळवंट
झालो संसारपूजेत
कधी भक्त, कधी भाट

२

लहर लहर पाणी

मन निथळे बहर

गंध गंध फूल
मन पाखरू स्वच्छंद

सूर सूर वेळू
मन कान्हाची बंसूर

रंग रंग सांज
मन आत आत दंग

३

वाजे तुझा पदरव
तिथं आलं माझं मन
तुझ्या पायात पैंजणे
मन झंकारतं गाणं

४

मन खिडकीचे होता
होते 'आठव' चांदणे
हळू शीतल वाऱ्याशी
माझ्या जुईचे झुलणे
■

## गफलत

पाखरांनो तुमचे पंख तुम्हाला
आनंदाच्या प्रदेशात घेऊन गेले,
हे... या शिशिर कडाक्यात
माझ्याच पायदळी झडलेल्या
पाचोळ्याइतकंच सत्य आहे...
तुम्ही गेलात त्या प्रदेशात तरी
वसंताचे संगमवारे पोहोचले असतील बहारीनं!

तुमच्यातल्या एका साथीदाराचं कलेवर मात्र
माझ्या पाचोळ्यात विदीर्ण पडलंय

तुम्हा आनंदाच्या वाटसरूंच्या प्रेमात पडू नये म्हणतात!
तुमच्या विरहातून वेदनांचे जन्म होतात...
माझ्या निष्पर्ण हतबलतेनं मी
त्याच्या कलेवरावर सावलीही धरू शकत नाही मित्रांनो
...तुम्ही त्याला सोडून कसे काय गेलात?
इथं मात्र आख्यायिका जन्माला आलीय
त्याचं माझ्यावर प्रेम होतं म्हणून!

आख्यायिकांवर इतिहास जगत असला
तरी पुढच्या मोसमात
माझ्या बरबादीची गाणी
गाऊ नका!...

■

## आत खोल

नितळ गहिऱ्या पाण्यावर
कधी एखादी मासोळी
उसळून येते
चमकून जाते
पुन्हा सारा डोह शांत
...मासोळी मात्र
आत खोल कुठंतरी
सारा डोह घुसळत असते
नकळत अविरत
■

## युगामागुनी युगे

‘ती आली... ती आली’ म्हणता
विरते काठावरती
तिच्या मागुनि येते दुसरी
तिला शोधण्यासाठी

ती रेतीत हरवू पाहते
दुसरी तिच्यामागुनी फिरते
पण तिसरी आवेशाने
दोघींना नेण्या येते

त्या दोघींनी अंगावरती
रेती पांघरलेली
तिसरीवरही समुद्रधुनीची
भुरळ पसरली ओली

पण चवथी आली डिवचत
मागून तिसरीच्या तंद्रीला
अन् चौघीजणीही फेर धरोनी
दर्या आधीन झाल्या

हे असे चालले उसळत विरणे
युगामागुनी युगे
त्यांची स्वप्ने घुसळत हळवी
चंद्र नागवा बघे

■

## भान

अज्ञानात सुख असतं
आणि आंधळ्या माणसाच्या चेहऱ्यावरचा
चौकस भाबडेपणाही.
हा भाबडेपणाही चौकशी करत असतो
अज्ञानाची करंगळी घट्ट पकडूनच.

...मग कधीतरी त्याला
न कळावं ते अचानक कळून जातं
आंधळ्याच्या खाचांत क्षणार्धात बुबळं फुटतात. पण
त्यानं आजवर कुरवाळलेली, उरात खोल जपलेली
प्रत्येक गोष्ट अविश्वसनीय, किळसवाणी, हिडीस
असल्याचं त्यांच्या लक्षात येतं...
आंधळेपणी या प्रत्येक गोष्टीवर त्यानं जीव तोडून
प्रेम केलेलं असतं...

मग त्याच्या डोळ्यांच्या खाचांत
कल्पना आणि वास्तवातली भेग रुंदावत जाते
घुसमटणारा काळोख गिळायला सरसावतो
गर्भगळित गात्रांसह तो सारेच पुन्हा स्वीकारतो
सर्वज्ञानी योग्याच्या चेहऱ्यावरचं म्लान आणि प्रसन्न हसू
त्याच्या चेहऱ्यावर खेळत राहतं
डोळसपणे पाहिलेल्या किळसवाण्या अंधाराला
सोबत घेऊन त्याची प्रत्येक पेशी मग
आत्मविश्वासाने आणि शांतपणे परिवर्तनाच्या
दिशेने कूच करत असल्याचं भान
त्याच्या डोळ्यात आपसूक उगवलेलं.

■

## कविता का लिहायची?

मुक्या आयुष्याच्या सोबतीनं
खुरडत चालणारे तुम्ही आम्ही
फारच मुके आहोत दोस्त... फारच

अरे आयुष्याला स्वत:चे पदर तरी
असतात अनेकरंगी, भावनांचे...
पण आपला पदर एकरंगीच,
तोही विटका...
ज्याचा स्वत:चा रंग कोणता होता
हे ज्याचं त्याला कळणं देखील अशक्य.

ते फक्त स्वप्नातच येतात रंगात,
आणि रंगवून जातात एका
शहाऱ्यासाठी हव्याहव्याशा. पण...
स्वप्न जगण्याची बोलण्याची
सवयच जेव्हा हासडून काढलीय...
...तेव्हापासून –

विटत गेलेयत आपल्या
एकपदरी आयुष्याचे रंग
आणि झडत गेलीय आपली जीभ
मूकपणे मुकेपण कवटाळून...

तू म्हणशील, मग हे तरी तू कुठून बोलतोस!
खरं सांगू दोस्त –
आदिमानवाला जरी तू ही अक्षरांची
लिपी शिकवली असतीस ना
तर त्यानं सुध्दा ही अक्षरं अशीच
नक्षीसारखी अंथरली असती
तुझ्या हृदयावर
आणि म्हणाला असता हसून...
कविता, का लिहायची कविता?

■

'कबुतरखाना' हा महेश कराडकर यांच्या सकस कवितांचा पहिलाच संग्रह आहे. या संग्रहाचे शीर्षक जात, धर्म, लिंगभाव आणि तथाकथित सामाजिक जाणीव या व्यवस्थेच्या नजरकैदेत कप्पेबंद झाल्याचे सूचन करते.

ही कविता मैत्री, स्नेहभाव, सग्यासोयऱ्यांचे सुखदु:ख अधोरेखित करताना कुठेही हळवी अथवा भावविवश होत नाही. उलट या प्रकारच्या सर्वच मूल्यभावांना भिडून रोकडे प्रश्न उपस्थित करते. खोटेपणा किती दाखवावा, किती मिरवावा याची काही सीमा राहिलेली नाही. उलट अशाच प्रवृत्तींना बेरकीपणाने उचलून धरले जाते आहे, याची जोरकस खंत कवीला आहे. म्हणूनच कवी

> 'तुकोबाच्या धोतराला ग्लोबल चेन' लावून
> देशीपणा मिरवणाऱ्या दांभिकांची हजेरी घेतो,

परंतु यातूनच कवीला वास्तविकता तपासून पाहण्याची निकड वाटते. सगळीच मूल्ये उलटीसुलटी गुंडाळून खोटा मोठेपणा मिरवणाऱ्या संधीसाधूंच्या गर्दीत कवीला अजिबात रस नाही. यामध्येच कवीची स्वत:ची स्वतंत्र, स्वच्छंद आणि ठाम भूमिका असल्याचे कविता वाचताना आढळून येईल.

> 'स्वीस बँकवाले चित्रगुप्ताच्या बापालाही
> बँक अकौंट दाखवणार नाहीत'

हे नागडे सत्य कविता वाचताना स्वीकारावे लागते.

आर्थिक उदारीकरण, भ्रष्टाचार, फसवणूक, हिंसा याने ग्रस्त झालेल्या समाजाची लाज झाकायला गांधीजींच्या 'माकडांचे' सहा हातही पुरेसे पडणार नाहीत, असे कवी ठामपणे मांडतो.

एका अस्वस्थ मनाने उद्याच्या स्वस्थ, सुरक्षित, निर्भय अवकाशात झेप घेण्यासाठी खुला केलेला हा 'कबुतरखाना' खरोखरीच चिंतनीय आहे.

**– प्रा. डॉ. मोहन पाटील**

पद्मगंधा
प्रकाशन